**उलटतपास सर्व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.टी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

वादी माझा सख्खा भाऊ आहे. गट क्र. १०९ माझा आहे. जमीन गट क्र. १०९ मध्ये ६ एकर ६ गुंठे जमीन आहे. ती जमीन मला वाटणीने मिळाली आहे. ती वाटणी भावात व माझ्यामध्ये झाली होती. मला हे माहीत नाही की, त्या वाटण्या कोण कोणत्या जमीनीबाबत झाल्या होत्या. वाटणी २५ वर्षापुर्वी झाली होती. हे मला वाचता येत नाही की, माझ्या शपथपत्रामध्ये माझा भाऊ गट क्र. १०७ मध्ये ६ एकर २ गुंठे जमीनीचा मालक व ताबेदार आहे असे लिहीले आहे. मला तो मजकूर वाचून दाखविण्यात आला होता. माझा भाऊ गट क्र. १०७ मध्ये ६ एकर २ गुंठे जमीनीचा मालक व ताबेदार आहे असे लिहलेले चुकीचे आहे.

२. वळीबा शिंदे यांना मी ओळखतो.

प्रश्न– सन १९८५ मध्ये वळीबा शिंदे यांनी माझा भाऊ गट क्र. १०७ मध्ये ६ एकर २ गुंठे यांना जमीन विकली होती ?

उ.– २ एकर २ गुंठयाचे मग काय झाले ?

सन १९८७ ला ६ एकर २ गुंठयाच्या जमीनीच्या पुर्वेला माझी गट क्र. १०९ मधील जमीन, पश्चीमेला माझा भाऊ शंभू यांची जमीन, उत्तरेला शिव, दक्षीणेला रतन कोळी अशी जमीन होती. हे म्हणणे खरे नाही की, शंभू यांना गट क्र. १०७ मध्ये ८२ आर जमीन आहे असे मी खोटे सांगत आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझा भाऊ असल्यामुळे मी खोटे शपथपत्र दिले आहे.

नि. दि. दा. क्र.६३/२०१५

संभू वि.. कल्याणराव व इतर

नि.क्र. १०७

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

VIKAS SHIVAJI WAGHMODE

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2025.06.16 13:12:09 +0530

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. १६/०६/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर